**घटक २ — आधुनिक भारतीय लोकशाही**

a) **प्रातिनिधीक लोकशाही**

b) **संसदीय लोकशाहीची वैशिष्टे**

c) **भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने/ समस्या**

## a) प्रातिनिधीक लोकशाही

अधुनिक राज्ये ही राष्ट्र राज्ये आहेत. त्यांचा भौगोलिक आकार व लोकसंख्या दोन्ही विशाल आहेत. त्यामुळे समकालीन जगामध्ये प्रातिनिधीक लोकशाहीचे स्वरूप पहावयास मिळते. दोन हजार वर्षापुर्वी ग्रीक नगर राज्यामध्ये प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग केला जात असे. नगरराज्यातील नागरीक एकत्र बसुन निर्णय घेत असत. शासन व प्रशासन यात प्रत्यक्ष जनतेचा सहभाग असत. काळाच्या ओघात प्रत्यक्ष लोकशाहीचा अवलंब करणे कठीण झाल्याने प्रतिनिधीक लोकशाहीचा विकास झाला.

जनता प्रत्यक्ष शासन व्यवस्थेमध्ये सहभागी होत नाही. जनता आपले लोकप्रतिनिधी विषिष्ठ काळासाठी निवडते. ते प्रतिनिधी एकत्र बसुन सर्व जनतेच्या वतीने निर्णय घेतात. शासन चालवितात, प्रशासन चालवितात यास प्रतिनिधीक लोकशाही असे म्हटले जाते. आज जगातील सर्वच देशामध्ये प्रातिनिधीक लोकशाहीचे प्रारूप पहावयास मिळते. भारतामध्ये लोकसभा व राज्य विधानसभा यामध्ये जनतेकडून प्रतिनिधी निवडून पाठविले जातात. हे लोकप्रतिनिधी देशाचा कारभार चालवितात. म्हणून भारतीय लोकशाही ही प्रातिनिधिक लोकशाही आहे.

ग्राम पंचायत, नगरपालिका किवा इतर अशा शासन संस्था या सर्वांमध्ये प्रातिनिधीक लोकशाही पहावयास मिळते. व्यवहारात प्रत्यक्ष लोकशाहीचा प्रयोग शक्य नाही. कारण सर्व लोक मिळून निर्णय घेणे कठीण काम आहे. म्हणून प्रतिनिधी निवडले जातात किंवा काही वेळा नियुक्त केले जातात. सर्वांच्या वतीने कांही लोक शासन प्रक्रीयेत सहभागी होणे म्हणजे प्रतिनिधीक लोकशाही होय.

प्रतिनिधीक लोकशाहीतील प्रतिनिधी निवडण्याची पध्दती व कार्यकाल वेगवेगळा असू शकतो. भारतातील लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षे आहे तर अमेरिकेतील प्रतिनिधीगृहाचा कार्यकाल दोन वर्षे आहे. कांही ठीकाणी मतदानाचा अधिकार सर्व नागरिकांना असतो तर कांही ठीकाणी मतदानाचा अधिकार ठराविक जनतेला असतो. भारतीय लोकशाहीमध्ये १८ वर्षे पूर्ण असणाऱ्या सर्व भारतीय नागरीकांना मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. जात, धर्म, लिंग, उत्पन्न असा कोणताही भेदभाव न करता सर्वांना मतदानाचा समान अधिकार देण्यात आला आहे. प्रनिधीगृहात सर्वांना संधी मिळवी यासाठी आरक्षणाची विषेश तरतूद करण्यात आली आहे. स्थानिक

स्वराज्य संस्थामध्ये महिला, अनुसूचीत जाती, अनुसूचीत जमाती व इतर मागास प्रवर्ग यांना कांही जागा आरक्षीत ठेवण्याची तरतूद आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने सर्व घटकांना लोकशासही संस्थांमध्ये प्रतिनिधी होण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

लोकसभा व राज्य विधानसभा या सर्वोच्च सभागृहामध्येसुध्दा महिला, अल्पसंख्यांक व मागास प्रवर्ग यांच्या प्रतिनिधींचा समावेश पहावयास मिळतो.

## b) संसदीय लोकशाहीची वैशिष्टे

इंग्लंडच्या धर्तीवर भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला आहे. लोकनियुक्त संसद व राज्य विधीमंडळ यांना व्यापक अधिकार राज्यघटनेने देवु केले आहेत. लोकसभा व विधानसभा यांना व्यापक अधिकार असल्याने शासन व प्रशासन यांना या सभागृहातील प्रतिनिधींच्या विचारांचा योग्य आदर करावा लागतो.

भारतीय संसदीय लोकशाहीची वैशिष्टे पुढील प्रमाणे.

१. सामुहीक जबाबदारीचे तत्व— संसद व राज्यविधीमंडळ यांना शासन (मंत्रिमंडळ) जबाबदार आहे. मंत्रिमंडळ सामुहीकरीत्या लोकसभा व विधानसभा यांना जबाबदार असते. लोकप्रतिनिधींना

२. गोपनीयतेचे तत्व— भारतीय संसदीय लोकशाहीमधील दुसरे महत्वाचे वैशिष्ट म्हणजे गोपनियता. मंत्रिमंडळाच्या बैठका गोपनिय पध्दतीने चालतात. मंत्रीमंडळातील मतभेत किंवा चर्चा सार्वजनिक कली जात नाही. केवळ निर्णय जनतेला कळविले जातात.

३. नामधारी व वास्तववादी सत्ताप्रमुख — भारतीय संसदीय लोकशाहीत दोन शासनप्रमुख आहेत. पंतप्रधान हा वास्तववादी प्रमुख आहे तर राष्ट्रपती हा नामधारी प्रमुख आहे. देशाचा कारभार राष्ट्रपतींच्या नावे चालविला जातो. परंतु वस्तविक सर्व अधिकार पंतपधानाला असतात. त्याचप्रमाणे राज्यात राज्यपाल हा नामधारी व मुख्यमंत्री हा वास्तववादी शासन प्रमुख असतो.

४. कायदेमंडळाप्रति उत्तरदायी — लोकसभा किंवा घटक राज्यातील विधानसभा यांचा विश्वास असेपर्यंत मंत्रिमंडळाला सत्तेवर राहता येते. हे संसदीय लोकशाहीचे महत्वाचे तत्व आहे. मंत्रिमंडळाला आपल्या प्रत्येक महत्वाच्या निर्णयाला कायदेमंडळाची संमती घ्यावी लागते. लोकसभा किंवा विधानसभा यांच्या संमतीविना शासनाला कर जमा करता येत नाही किंवा पैसा खर्च करता येत नाही.

## c) भारतीय लोकशाहीसमोरील आव्हाने/ समस्या

i) जात—जातीय राजकारण

ii) धर्मांधता— जमातवाद

iii) प्रादेशिकतावाद

भारतीय राजकारणात अलिकडे 'राष्ट्रीय एकात्मता' हा एक महत्वाचा ज्वलंत प्रश्न होऊन बसलेला आहे. वास्तविक राष्ट्रीय एकात्मता ही काही नवी संकल्पना नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात राष्ट्रीय ऐक्याची भावना जनमानसात खोलवर रूजलेली होती. ब्रिटीश राजवटीत भारतीय जनता राष्ट्रीयत्वाच्या भावनने एकत्र आलेली होती. धर्म, जात, वंश, भाषा, प्रदेश, पंथ असा कोणताही भेदभाव न मानता 'आम्ही सारे भारतीय आहोत' या एकाच समान भावनेने येथील जनतेने ब्रिटीश साम्राजाशी संघर्ष केला. पारतंत्र्यात असलेल्या भारतात राष्ट्रीयत्वाची भावना प्रखर झाल्यामुळे ब्रिटीशांना हा देश सोडून जावे लागते. स्वातंत्र्याप्राप्तीनंर ही राष्ट्रीय एकात्मतेची भावना ओसरत गेली. गेल्या ७० वर्षाच्या काळात राष्ट्रात अनेक समस्या निर्माण झाल्या. भाषावाद, धर्मवाद, जातीयता, प्रदेशवाद असे वाद व संघर्ष निर्माण झाले. त्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना कमी झालेली दिसते.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर भारताच्या विविध प्रदेशात समाजाच्या विविध स्तरात एक राष्ट्रीयत्वाची भावना जेवढया प्रमाणात वाढावयास पाहिजे होती तेवढया प्रमाणात ती वाढलेली नाही. उलट भारतीयांच्या अनेक संकुचित भावना संकुचित अस्मिता उफाळून वर आल्या. त्यातूनच अनेक धार्मिक, जातीय, भाषिक, प्रादेशिक तणाव, संघर्ष उद्‌भवले. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सारे भारतीय लोक एकत्मतेच्या भावनेने लढले. भारतात भिन्न जातींचे धर्मांचे भाषांचे लोक असतानाही त्यांनी भिन्नत्वात (विविधतेत एकता) ऐक्य निर्माण केले. (Unity in Diversity) परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीयांतील भिन्नत्वाचेच दर्शन अधिक प्रमाणात झालेले आहे. प्रांतवाद,भाषावाद,धर्मवाद, जातीय संघर्ष असे प्रश्न निर्माण झाल्यामुळे लोकशाहीसमोर आव्हान निर्माण झाले आहे. समकालीन भारतीय लोकशाहीसमारील आव्हाने किंवा समस्या पुढील प्रमाणे.

**i) जातीय राजकारण —**

भारतीय लोकशाहीत जातीय राजकारणाची समस्या ही एक अभ्यासनीय बाब मानली जाते. भारतीय राजकारणावर जातीवादाचे पडसाद कमी —अधिक प्रमाणात उमटलेले दिसतात. अगदी ग्रामपंचयतीच्या निवडणुकीपासून ते लोकसंभेच्या निवडणुकीपर्यंत जीतयतेचा प्रभाव आढळतो. भारतीय राजकारणला जातीयतेची कीड लागलेली आहे असे म्हटले तर चूक ठरणार नाही.

भारतीय राजकारणात जातीयतेचा प्रभाव किती आहे? त्याचे स्वरूप काय आहे? जातीयतेची समस्या कशी दूर करता येईल? इत्यादी विषयक अभ्यास करणे आवश्यक ठरते.

भारतात हिंदू, जैन,शीख,ख्रिश्चन,मुस्लीम,पारशीअशा विविध धर्माचे लोक आहेत. या विविध धर्मात जाती,उपताजी पंथ निर्माण झालेले आहेत. जातिव्यस्थतेचे वैशिष्टय असे की,प्रत्येक जात ही दुसऱ्या जातीहून वैशिष्टयपूर्णरित्या वेगळी असते. जन्मावररून व्यक्तीची जात ठरली जाते. जातीयेतचा प्रभाव समाजतील विविध  संस्थावर व संघटनांवर पडलेली दिसतो. शिक्षण संस्था, बॅका, सहाकारी पतपेढया, विविध उद्योगधंदे, परिषद, संघटना, वसतिगृहे, धर्मशाळा, सांस्कृतिक केंद्र इत्यादी संस्था व संघटनाना विशिष्ट जातींची नांवे दिलेली दिसतात. जीतयतेचा विशेष प्रभाव भारतीय लोकशाहीवर पडलेला दिसतो.

भारतातील विविध घटक राज्यांचे राजकारण आणि जातीचा विशेष प्रभाव

१) कर्नाटक राज्यात लिंगायत व ओक्कलिंगा या दोन जातींचा विशेष प्रभाव जाणवतो.

२) आंध्र राज्यात रेड्डी आणि कम्मा या दोन जाती राजकारणात प्रभावी आहेत.

३) केरळ राज्यात ब्राम्हण (नंबुद्रीपाद) नायर आणि इसवा या जाती असून नायर जातीचा तेथील राजकाणारवर विशेष प्रभाव आहे.

४) बिहार राज्यात राजपूत,ब्राम्हण,कायस्थ आणि अदिवासी या प्रमुख जाती आहेत.

५) तमिळनाडू राज्यात मुदलियार,गौंडर व पदयाची या जाती राजकारणात प्रभाव पाडताना दिसतात.

६)महाराष्ट्रात मराठा, ब्राम्हण, मागासवर्गीय जाती यांचा राजकारणात प्रभाव जाणवतो. मराठा जातीचा प्रभाव निवडणुकांवर आणि मंत्रिमंडळावर पडलेला आहे.

जातीय राजकारण हे राष्ट्रीय ऐक्याला आणि एकात्मेला घातक ठरू लागले आहे. भारतात जातीजमातीमधील संघर्ष घातक ठरू लागलेले आहेत.भारतात जाती जमातीमधील तणाव व संघर्ष वाढू लागलेले आहेत. राजकीय पक्ष मतांच्या स्वार्थपोटी जातीयेतला खतपाणी घालताना दिसतात. भारतीय घटनेने समाजातील जातीयता कमी करण्यासाठी काही घटनात्मक तरतुदी केलेल्या आहेत. दलित जातीवर होणारे अन्याय थांबविण्यासाठी अस्पृश्यता निवारणाचा कायदा समत केलेला आहे. मागासवर्गीय जातीजमातीच्या विकासासाठी अल्पसंख्याक आयोग नियुक्त करण्याची तरतुद केलेली आहे. राज्यकारभारात त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी राखीव प्रतिनिधित्वाच्या जागा ठेवलेले आहेत. शिक्षण, नोकऱ्या, उद्योगधंदे यात त्यांना सधी मिळवून देण्यासाठी राखीव जागा व सुखसोई उपलब्ध करून दिलेल्या आहेत. अलिकडे केंद्र सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशी अमलात आणण्याचाउपक्रम सुरू केला आहे.

भारतीय समाजातील जातीयतेचा अडसर दूर करण्यासाठी शासन, राजकीय व सामजिक कार्यकर्ते आणि जनता यांनी जबाबदारीने जाणिवेने जतिनिर्मूनाचे कार्य सातत्याने करणे आवश्यक आहे.

**ii) धर्मांधिता व जमातवाद —**

भारतीय राज्यघटनेने धर्मनिरेपक्ष राज्याच्या (Secular state) पुरस्कार केलेला असला तरी धर्मांधता हा लोकशही मार्गातील मोठा अडसर मानला जातो. स्वातंत्र्यपूर्व काळापासून ते आतापर्यंत सातत्याने धर्मांधता व जातीयता हे घटक राष्ट्रीय एकात्मतेला मारक ठरले आहे. भारतात हिंदू, मुस्लीम, ख्रिश्चन, पारशी, जैन, बौध्द इत्यादी धर्माचे लोक राहतात. परंतु या भिन्नधर्मीय लोकांत सहिष्णुतेची सहकार्याची भावना आढळत नाही. हिंदू —मुस्लीम संघर्षातून देशाची फाळणी झाली हे वेगळे सांगण्याची गरज नाही. परंतु फाळणीनंरत जे मुस्लीम बांधव आपल्या देशात राहील त्यातील कांही कटटरतावादी मुस्लीम भारताच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील झालेले नाहीत असे खेदाने म्हणावे लागते. वास्तविक भारतातील अल्पसंख्याक मुस्लिमानी भारतीय राष्ट्रवादाशी जुळवून घ्यावयास पाहिजे होते. परंतु ते त्यांच्याकडून घडलेले नाही, यामागील कारण असे असू शकेल की हिंदू धर्मात ज्या सुधारणा झाल्या जी परिवर्तन झाली तशा सुधारणा व परिवर्तने मुस्लीम धर्मात झालेली नाहीत. हिंदू समाजात अनेक धर्मसुधारक झाले, त्यांनी हिंदू धर्मातील तत्वे वास्तवतेशी जुळवून घेतली. इस्लाम धर्मात महंमद पैगंबरानंतर सुधरणावादी धर्मगुरू झाला नाही. त्यामुळे त्यांच्या धर्मकल्पना जुन्याच राहील्या. साहजिकच नव्या धर्मसुधारणेला ते नेहमी विरोध करताना दिसतात. हीच खरी अडचण समान नागरी कायदा करताना निर्माण होते. मुस्लीम समाज राष्ट्रीय प्रवाहात सामील झाला नाही याला आणखी एक बाब कारणीभूत ठरते हिंदू धर्मातील कटटर धर्मगुरूंनी मुस्लीमांना सातत्याने विरोध केला. त्याचप्रमाणे कटटर हिंदू यांनी देखिल समाजात इतर धर्माबद्दल कटटर भाव निर्माण केला आहे.

अलिगढ, जमशेदपूर,मोराबाद,अहमदाबाद,मालेगांव,भिवंडी,मिरज, वाराणशी,मुंबई, बडोदा, गोध्रा अशा अनेक ठिकाणी धार्मिक व जाती करणावरून ज्या दंगली घडून आल्या. त्या राष्ट्रीयत्वाच्या भावनलो बाधा आणणाऱ्या आहेत या बाबत शंका बाळगण्याचे कारण नाही. गेल्या ७० वर्षात भारतात अनेक लहान मोठया धार्मिक व जातीय दंगली झाल्या. फळाणीच्या वेळी किमान दोन लाख लोकांची हत्या झाली.अलिकडे धर्मनिरपेक्षतेचा अर्थ 'सर्वधर्मसमभाव' असा सोईस्करपणे लावला जात आहे. वास्तविक धर्मनिरपेक्षतेचा खरा अर्थ म्हणजे धर्माचा कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप राजकारणात होऊ न देणे. शासकीय पातळीवर कोणत्याही धर्माला मान्यता न देणे हा आहे. भारतीय घटनाकारांनी नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार दिलेला असला तरी धर्मआणि राजकारणयांची पूर्णपणे फारकत केलेली आहे.परंतु भारतातील सर्वच राजकीय पक्ष निवडणुकीच्या वेळी धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला हरताळ फासतात.

जातीयवाद,जमातवादआणि मूलतत्ववाद हे लोकशाही मार्गातील सवंदेनाशील व प्रभावी अडथळे आहेत.स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजात सर्वच राजकीय पक्ष कमी —अधिक प्रमाणात निवडणुकीत जातीयवादाचा जमातवादाचा वापर करताना दिसतात. गठ्ठा मते खात्रीशीर मिळवायची

असतील तर जातीय पीळ टिकवनू धरावा लागतो. भारतात सर्वच राजकीय पक्ष लोकांच्या धार्मिक व जातीयतेच्या भावना चेतवितात आणित्यांची मते मिळवनू निवडून येतात. असे निवडून गेलले प्रतिनिधी विशिष्ट धर्माचा जातीचा फायदा करून देतात. त्यांना राष्ट्रहितापेक्षा धर्महिताची, जातीयेतची ओढ अधिक लागलेली असते.

त्यासाठी समान नागरी कायदयाची निर्मिती आणि अंमलबजावणी झाली पाहिजे असा आग्रह कटटर हिंदूत्ववादी संघटना करतात. धार्मिक सणांच्या सुट्यां बंद केल्या पाहिजेत, देवदेवतांची शासकीय पूजा बंद केली पाहिजे. धार्मिक व जातीय घटकांवर आधारलेल्या पक्षांना आणि संघटना यांना कायदयाने बंदी घातली पाहिजे. शिक्षणसंस्था, शासकीय कचेऱ्या, यातून व्यक्तीच्या धर्माची व जातीची नोंद करता कामा नये. शासकीय प्रसार माध्यमातून धर्म जात यांच्याशी संबंध असणारे कार्यक्रम दाखविणे बंद केले पाहिजे. इत्यादी गोष्टी केल्या तर धार्मिकता जातीयता कमी होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीला लागेल. अर्थात, भारतीय जनतेवर धर्म जातीचा एवढा जबरदस्त पगडा बसलेला आहे की, या सुधारणा घडवनू आणणे अत्यंत कठीण स्वरूपाचे कामआहे. तेव्हां सर्व धर्मात आधुनिकरण झाल्याशिवाय या सुधारण घडवनू आणता येणार नाहीत.

**iii) प्रादेशिकतावाद—**

भारताच्या लोकशाही मार्गातील मोठा अडसर म्हणजे प्रादेशिकता होय भारतीय नागरीकांत प्रादेशिक अस्मिता,प्रादेशिक स्वाभिमान आढळून येतो. घटनेने भारतीयांना एकच नागरीकत्व दिले आहे.तरीपण भारतीय नागरीकांत प्रातांभिमान, भाषाभिमान आधिक दिसतो. सन १९५६ साली संपूर्ण देशात भाषावार प्रांतरचना निर्माणकरण्यात आली. भाषावार प्रांतरचनेमुळे प्रादेशिक निष्ठा, प्रांतीयता,फुटीरवृत्ती संपुष्टात येईल असे वाटले होते. परंतु प्रत्यक्षत मात्रवेगळीच परिस्थिती निर्माण झाली. भाषावार प्रांतरचनेमुळे काही नवे प्रश्न निर्माण झाले. सीमावादासारखे प्रश्न निर्माण झाले. राज्या—राज्यात संकुचित भाषिक प्रादेशिकता प्रकट होऊ लागली.
महाराष्ट्र—गुजरात,महाराष्ट्र—कर्नाटक,पंजाब — हरियाना यांच्यात सीमावाद उत्पन्न झाले.

आसामच्या डोंगरी प्रदेशातील जनतेची प्रादेशिक निष्ठा वेळोवेळी प्रकट झाल्यामुळे मेघालय, नागालॅड,मणिपूर, मिझोराम, त्रिपुरा,अरूणाचल ही राज्ये निर्माण करावी लागली आहेत. या डोंगरी प्रदेशातील जनतेने स्वतंत्र राज्यासाठी उग्र व हिंसक निदर्शने आंदोलने केली. त्यांची प्रादेशिक निष्ठा जबरदस्त होती. प्रादेशिकता ही राष्ट्रीय एकात्मतेल घातक आहे. तेंव्हा जनतेतील ही प्रादेशिक निष्ठेची संकुचिता भावना कमी करून त्यांच्यात राष्ट्रीयत्वाची भावाना वाढीस लागली पाहिजे. त्यासाठी लोकांच्या मागणीप्रमाणे सहकार्याचे संबंध ठेवनू राज्यकारभार करावा. चार मोठया राज्यांची आणखी आठ,लहान राज्ये निर्माण झाली तर फारसे बिघडणार नाही उलट लहान लहान राज्ये कार्यक्षमतेने काटकसरीने राज्यकारभार करतील आणि केंद्र सरकारला राहकार्य देऊन राष्ट्रीय

एकात्मता जोपासतील असे काही विचारवंताचे मत आहे. काही टीकाकारांचे मत असे आहे की प्रादेशिकता कमी करण्यासाठी नवीन राज्ये निर्माण करणे हा उपाय  ठरण्याऐवजी अपाय ठरले. लहान—लहान राज्ये प्रादेशिक निष्ठा जोपासू लागतील आणि केंद्र सरकारशी आणि इतर राज्यांशी आर्थिक संघर्ष करतील त्यामुळे ही राज्ये राष्ट्रीय एकात्मतेला तर घातक ठरतीलच परंतु साऱ्या देशात विघटनाचे राजकरण सुरू होईल.

तेंव्हा नवीन घटक राज्ये निर्माण करून राष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गातील प्रादेशिकता हा अडसरदूर करता येणार नाही. थोडक्यात संकुचित प्रादेशिक निष्ठांना वाजवीपेक्षा जास्त महत्व देऊन चालणार नाही. त्याचबरोबरच प्रभावी प्रादेशिक निष्ठांना डावलूनही चालणार नाही, यातून सुवर्णमध्ये साधनेच योग्य ठरेल.

**सारांश**

देशातील ग्राम पंचायाती पासून संसदेपर्यंत आणि शिपाई पदापासून उच्च पदस्थ अधिकारी वर्गापर्यंत जातीयता हा एक गंभीर प्रश्न आहे. व्यक्तीची गुणवत्ता त्यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक गुणवत्तेवर ठरविण्यात यावी. परंतु, जातीच्या आधारे अनेकदा दुर्बल घटकांवर अन्याय होतो. जातीयवाद हा देशाला लागलेला एक कलंक आहे. जातीयवादाप्रमाणे धर्माधिता ही देखील एक गंभीर समस्या आहे. देशात विविध धर्मसमुदायांमध्ये एकमेंकांबद्दल अविश्वसाचे राजकारण निर्माण झाल्यामुळे भीतीचे वातावरण दिसत आहे. ही धर्माधिता देशाच्या एकतेला व विकासाला मारक ठरू शकते. जनतेमध्ये देशापेक्षा आपल्या प्रांत किंवा प्रदेशाप्रती असणारे प्रेम म्हणजे प्रादेशिकतवाद. भाषा व संस्कृतीच्या आधारे प्रांतवादाला खतपाणी घातले जाते.

अनेक युवक काम करण्यास पात्र व इच्छुक असून देखील त्यांना काम मिळत नाही. या युवकांपासून लोकशाहीला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. दहशतवाद, आतंकवाद, इत्यादी माध्यमातून लोकशाही समोर प्रश्न निर्माण झाले आहेत.

उपरोक्त प्रश्नांप्रमाणे प्रंसगानुरूप अनेक समस्या देशासमोर उभ्या होतात. महापूर, दुष्काळ, वादळ, हिमपात इत्यादी  नैसर्गिक आपत्ती अनेक सामाजिक व राजकीय आपत्तींना कारणीभूत ठरतात.